तरुण भारत
Akola Main | 2026-05-21 | Page- 11
epaper.tarunbharat.net

# अभियांत्रिकी पदविका प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

## दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

◆ **वाशीम, २० मे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता राज्यातील अभियांत्रिकी पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमाची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २० मे पासून सुरु झाली असून, २२ जून ही शेवटची तारीख आहे.

ऑनलाइन अर्ज भरणे व निश्चिती करणे याकरिता उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननी पद्धती पर्याय निवडू शकतील. उमेदवाराचा अर्ज व कागदपत्रे सुविधा केंद्रा द्वारे पडताळले जातील व निश्चित केल्या जातील. अर्जामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये कळविल्या जातील आणि दुरुस्तीची संधी दिली जाईल. शासकीय तंत्रनिकेतन वाशीम येथे ऑटोमोबाईल, सिव्हील, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व मेकॅनिकल अशा एकूण सहा शाखा आहेत. प्रवेश प्रक्रियेसाठी जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) नॉन क्रीमिलअरा (लागू असल्यास), उत्पनाचा दाखला, डोमासाईल व नॅशनलिटी प्रमाणपत्र आवश्यक आहेत. अधिक माहितीसाठी शासकीय तंत्रनिकेतन समुपदेशन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. काही अडचण आल्यास समन्वयक प्रा. वाय. व्ही. लहाने यांचेशी संपर्क करावा. वाशीम जिल्ह्यातील दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. बी. जि. गवलवाड यांनी केली आहे.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web